### अन्नद्रव्य व्यवस्थापन तक्ता

| वापरण्याच्या वेळा | युरिया | सुपर फॉस्पेट | पोटॅश |
|---|---|---|---|
| लागवडीच्या वेळेस | १२५ कि. | १५० कि. | १५० कि. |
| पुन्हा १५ दिवसांनी | १२५ कि. | १५० कि. | १५० कि. |
| पुन्हा १५ दिवसांनी | – – | १५० कि. | १५० कि. |
| एकूण | २५० कि. | ४५० कि. | ४५० कि. |



### कीड व्यवस्थापन –

१. रस शोषणारे कीटक : मावा, तुडतुडे, पांढरी माशी यांच्या नियंत्रणा करिता कराटे किंवा अलीका अर्धा मिली प्रमाणे या कीटकनाशकाची फवारणी करावी.

२. लालकोळी याच्या नियंत्रणासाठी ओबेरॉन या कोळीनाशकाची १ मिली प्रमाणे प्रतिलीटर पाण्यातून फवारणी करावी.

### रोग नियंत्रण –

**मररोग :** हा रोग झाडाच्या कोणत्याही अवस्थेत येतो. झाडाची पाने पिवळी पडून सुकल्या सारखी दिसतात व नंतर गळून पडतात. झाड हळूहळू सुकून मरते. या रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बनडेझीम एक ग्रॅम प्रति लिटर किंवा बाविस्टीन एक ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून झाडाच्या बुंध्याशी आळवणी करावी.

**करपा :** पिकावर लवकर येणाऱ्या करप्याचा प्रादुर्भाव आढळून आल्यास कवच दोन ग्रॅम किंवा स्कोअर एक मिली या प्रमाणे लागवडी नंतर आठ ते दहा दिवसांनी कळी उमलण्याच्या वेळी फवारणी करावी.



### फुलांची तोडणी, उत्पन्न व बाजारपेठ –

झाडांची चांगली काळजी घेतल्यास ४५ ते ६० दिवसात फुलांची पहिली तोडणी सुरू होते. या तोडणी नंतर दोन ते तीन महिन्या पर्यंत सलग फुलांचे तोडे चालू राहतात. हारांसाठी देठ विरहित तर पुष्पगुच्छ किंवा फुलदाणी साठी देठासहित फुले तोडणी करतात. तोडणी केलेली फुले प्लास्टिक क्रेट मध्ये प्रतवारी करुन बाजार पेठेसाठी पाठवावीत. फुले ताजी राहण्यासाठी एक टक्का साखरेचे द्रावण फवारणी करु शकता. चांगले अनुभवी शेतकरी या संकरित वाणापासून प्रतिएकरी आठ ते दहा टन फुलांचे उत्पादन सहजा सहजी घेऊ शकतात. सणासुदीच्या काळामध्ये झेंडूफुलाला बाजार भाव तीस रुपये पासून ते ७० रुपये पर्यंत उपलब्ध होतात. प्रति एकरी एका हंगामातून ८० ते ९० हजार रुपये उत्पन्न मिळू शकते.

• लेखक •

**श्री. विकास भिसे**
विषय विशेषज्ञ (उद्यान विद्या)

**डॉ. लालासाहेब रा. तांबडे**
प्रमुख तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ

* तांत्रिक सहाय्य *
**महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी**
**पुष्पविज्ञान संशोधन संचालनालय, पुणे**

| प्रकाशन वर्ष | घडी पुस्तिका | एकूण प्रकाशन | प्रति | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| डिसेंबर २०२३ | क्र.७८ | क्र.९७ | ३२०० | रु. १५१०४/- |

# उपयुक्त फूल पीक



# झेंडू

* संपादक व प्रकाशक *
**डॉ. लालासाहेब रा. तांबडे**
प्रमुख तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ

शबरी कृषी प्रतिष्ठान संचलित
## कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर
गट नं. २२/१ ब, सोलापूर-बार्शी रोड, मु. खेड, पोस्ट-केगांव,
ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर (महाराष्ट्र) फोन : ०२१७-२९९०५६३
visit us at : www.kvksolapur.org

**सौजन्य : जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, आत्मा, सोलापूर २०२३-२४**

# उपयुक्त फूल पीक झेंडू

## ओळख व महत्त्व –

झेंडू या फुलास गरिबाचे फुल म्हणतात. दसरा किंवा दिवाळीच्या वेळेस या फुलास भरपूर मागणी असते. कमी पाण्यात व हलक्या जमिनीतही हे फुल पिक उत्तम प्रकारे येऊ शकते. या पिकाचा दुसरा उपयोग म्हणजे भाजीपाल्याच्या पिकात मिश्रपीक म्हणून किंवा फळबागेत आंतरपीक म्हणून घेतल्यास पिकांना होणारा निम्याटोडचा त्रास कमी होतो.

## जमिनीची निवड –

झेंडू पीक दलदलीची जमीन सोडून सर्वप्रकारच्या जमिनीत चांगले येते. हलकी ते मध्यम प्रकारची जमीन या पिकास मानवते.



## हवामान –

हे पीक उष्ण कोरड्या व दमट हवामानात येते. आपल्याकडील हवामानात वर्षभर झेंडूचे पीक घेता येते. कडाक्याची थंडी या पिकास मानवत नाही.

## जमिनीची मशागत व पूर्व तयारी –

लागवड करण्यापूर्वी जमीन चांगली नांगरून घ्यावी तसेच कुळवाच्या दोन ते तीन पाळ्या द्याव्यात. हेक्टरी २५ ते ३० बैलगाड्या किंवा २५ ते ३० टन चांगले कुजलेले शेण खत जमिनीत टाकून मातीत मिसळून घ्यावे.

## संकरित व सुधारित जाती –

### आफ्रिकन झेंडू –

या प्रकारातील झेंडू उंच वाढणारे व काटक असतात. शंभर ते दीडशे सेंटीमीटर उंची पर्यंत त्यांची वाढ होते. फुले टपोरी पण संख्येने कमी असतात. या मध्ये पिवळा व भगव्या रंगाची फुले आढळतात.

### फ्रेंच झेंडू –

या प्रकारातील झाडे बुटकी म्हणजेच ३० ते ४० सेंटीमीटर उंचीची आणि झुडपा सारखी असतात. फुले एकेरी व लहान असतात. कुंडीत व बागेच्या कडेने लावण्यासाठी या महत्वाच्या जाती आहेत.



### संकरित झेंडू –

कमी उंचीच्या लवकर येणाऱ्या संकरित झेंडूच्या काही नवीन वाणांची सध्या शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पसंती असल्याचे दिसून येते. या प्रकाराची झाडे साधारणतः ३० ते ४० सेंटीमीटर उंचीची असून झाडाची ठेवण झुडपा सारखी असते व झाडाला भरपूर फांद्या आणि फुले लागतात.

### वैशिष्ट्ये

फुले गेंदेदार चार ते सहा सेंटीमीटर व्यासाची असतात. लागवडीनंतर ३५ ते ४५ दिवसांनी फुले तोडणीस येतात. फुले आकर्षक असून पिवळी, सोनेरी, नारंगी व पांढऱ्या रंगाची अशा वेगवेगळ्या जातीचे असतात. एका फुलाचे वजन सहा ते आठ ग्रॅम असते. या जातीचे वैशिष्ट्य म्हणजे फुल तोडल्यानंतर पाच ते सात दिवसापर्यंत ताजी टवटवीत राहतात, म्हणजेच लांबच्या बाजारपेठेसाठी पाठविण्यास संकरित झेंडूचे वाण उपयुक्त ठरतात.

## रोपांची लागवड –

रोपे सरी वाफ्यावर अथवा सपाट वाफेवर लावावी जमीन परत्वे उंच वाढणाऱ्या जातीसाठी ६० X ६० सेंटिमीटर बुटक्या जातीसाठी ३० X ३० सेंटीमीटर व मध्यम उंचीच्या जातीसाठी ४५ X ४५ सेंटिमीटर अंतरावर लागवड करावी.

## आंतर मशागत –

लागवडी नंतर पहिल्या आठवड्यातच रोपे जोम धरू लागतात. पंधरा दिवसा नंतर खुरपणी करावी. रोपाची लागवड केल्यानंतर २१ ते ३० दिवसाच्या दरम्यान रोपांचे शेंडे खुडावेत. २० पीपीएम जिब्रेलिक एसिड फवारल्यामुळे झाडाची उंची फुलांची संख्या व बियांचे उत्पन्न वाढते.

## पाणी व्यवस्थापन –

लागवडी नंतर पावसाळी हंगामा मध्ये पाऊस नसेल तेव्हा दर दहा दिवसांनी पाणी द्यावे. फुलांच्या कळ्या सुरू झाल्यानंतर ते तोडणी संपेपर्यंत पाण्याचा ताण पडू देऊ नये. ठिबक सिंचनाच्या माध्यमातून पाणी व्यवस्थापन केले असल्यास प्रति दिवशी एक तास ठिबक सिंचन संच चालवावा.

## एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन –

झेंडू फुलाचे भरपूर उत्पादन मिळवण्यासाठी वर खत देणे अत्यंत गरजेचे आहे. झेंडू पिकाला हेक्टरी २५०:४००:४०० नत्र स्फुरद पालाश या खताची मात्रा द्यावी लागते. ती मात्रा खालील खतांच्या माध्यमातून दिलेल्या तक्त्या प्रमाणे विभागून द्यावी.